



# श्री राघवेंद्रस्वामी चरितामृत स्तोत्र

## सद्गुरू प्रभु

पूज्याय राघवेंद्राय
सत्यधर्म रताय च ।
भजतां कल्पवृक्षाय
नमतां कामधेनवे ॥

# श्री राघवेंद्रस्वामी चरितामृत स्तोत्र

: लेखक :

**सद्गुरु प्रभु**

**किंमत २ रु.**

संपादक : प्रकाशक

**गुं. फ. आजगांवकर**

प्रकाशक : **गुं फ. आजगांवकर**
१७ के. जी. बी. निवास
मॅजेस्टिक समोर, मुंबई–४
फोन : २१ ४२ १२

कवि : **सद्‌गुरु प्रभु**
किशोरकुंज संगीतावाडीमार्ग
डोंबिवली, गिरगांव, मुंबई

प्रसिद्धी : **१ एप्रिल १९९०**

मुद्रक : **वि. ज. देसाई**
वैभव प्रिंटींग प्रेस
प्रार्थना समाज
मुंबई नं. ४०० ००४

# श्रीराघवेंद्र स्वामी चरितामृत स्तोत्र

श्री गणेशाय नमः

श्री सरस्वत्यै नमः

श्री गुरुभ्यो नमः

श्री सीतारामचंद्राय नमः

श्रीस्वामी राघवेंद्र प्रसन्नोस्तु

स्मरण करतो श्री राम । हनुमान जयाचा शिष्योत्तम ।
श्री राघवेंद्र स्वामीचे श्रद्धास्थान । विष्णु अवतार रामप्रभु ॥

ॐ नमो श्री गजवदना । गणराया गौरी नंदना ।
विघ्नेशा भवभयहरणा । नमन माझे साष्टांगी ॥ २ ॥

नमितो श्री सरस्वती । विश्वजननी भगवति ।
ब्रह्मकुमारी त्रिणावती । स्तोत्र लिहिण्या साह्य करी ॥ ३ ॥

मंत्रालयाची कुलदेवता । मंत्रालयांबिका देवता ।
नमन करतो राघवेंद्र माता । कुलदेवता नमोनमः ॥ ४ ॥

नमन माझे गुरुवर्या । सुख निधान गुरुराया ।
राघवेंद्र स्वामी मुनिवर्या । नमितो तुज मी पुन्हा पुन्हा ॥ ५ ॥

थोर ऋषिमुनी संतजन । माता पिता आणि श्रोतृजन ।
करोनी तुम्हा नमन । राघवेंद्र स्तोत्र लिहिले असे ॥ ६ ॥

मंत्रालय असे पवित्र स्थान । स्वामीजींचे आद्यस्थान ।
श्रावण मासी दर्शन । रथोत्सवी होत असे ॥ ७ ॥

भक्ता नसे जात पात । त्यांना नसे धर्मपंथ ।
अखील भारतीं त्यांचे भक्त । राघवेंद्राते भजताती ॥ ८ ॥

जैसी महाराष्ट्र असे संतभूमी । तैसी आंध्रकर्नाटक भूदेव भूमी ।
थोर संताची जन्मभूमी । कर्मभूमी तैसीच ॥ ९ ॥

आंध्रप्रदेशीं मंत्रालय ग्रामीं । तुंगभद्रातिरी वृंदावन भूमी ।
होते तेथे राघवेंद्र स्वामी । जैसे महाराष्ट्री ज्ञानेश्वर ॥ १० ॥

मंत्रालय क्षेत्री स्वामी वृंदावन । त्या समोरी मारुती देवस्थान ।
वृन्दावन वाम दिसे बदिद्रस्थान । मठद्वारी मंत्रालयांबिका ॥ ११ ॥

प्रल्हादराजा कृतयुगी । दुसरा व्यास कलीयुगी ।
राघवेंद्र अवतार महानयोगी । भगवान विष्णु स्वयें होती ॥ १२ ॥

तिमण्णा भटांचा व्यंकटनाथ । पुढे झाला राघवेंद्रनाथ ।
बालाजी कृपा होय यथार्थ । तिमण्णावरी ॥ १३ ॥

तिमण्णा पिता प्रथम गुरू । ॐ अक्षरी दर्शविती सद्गुरू ।
ॐमाजी विश्वंभरू । प्रचिती येई व्यंकटनाथा ॥ १४ ॥

पित्याच्या मृत्युउपरी । लक्ष्मी नृसिंह्माचार्य मेहुण्या घरी ।
व्यंकटनाथ जाती दुरी । पुढील अध्ययनासाठी हो ॥ १५ ॥

व्याकरण न्याय वेदान्त । वेदाध्ययनी होती पारंगत ।
देवता स्तोत्रें चिंतनात । व्यंकण्णाचार्य रमती सदा ॥ १६ ॥

पंडितांशी संवाद केला । अनेक पदव्या मिळती त्यांजला ।
परिमलाचार्यादि पदव्या लाभल्या । व्यंकण्णाचार्यांना ॥ १७ ॥

श्रोत्रीय कुटुंबी सरस्वती । विनयशील कन्या होती ।
व्यंकटाचार्य विवाह करिती । बंधु आज्ञेनें तिच्याशीं ॥ १८ ॥

अती दारिद्र्यीं दिन जाती । ईश चिंतनी पळें पळती ।
पुत्ररत्न लक्ष्मी नारायण येती । जन्मा बालाजी कृपेने ॥ १९ ॥

कुंभ कोणी सुधींद्र मठ । व्यंकटाचार्य अभ्यासिती पाठ ।
तर्कपाठ मिमांसा पाठ । चंद्रिका ग्रंथ अभ्यासिती ॥ २० ॥

सुदिंद्रनाथ संचार करिती । चौल देशीं फिरत येती ।
सोबत व्यंकटाचार्य असती ! स्थळ प्राचीन संस्कृतीचे ॥ २१ ॥

घरोघरी उपासना हवन । सत्कर्मा येई उधाण ।
स्वामी स्वागता संपूर्ण । प्रतिसाद उत्साहाचा ॥ २२ ॥

राजमन्नारी स्वामी येती । व्यंकटाचार्य चर्चा करिती ।
वादविवादी जिंकिती । महाभाष्य व्याकरणी ॥ २३ ॥

सुधिंद्र तीर्थ खुष होती । महाभाष्याचार्य पदवी देती ।
व्यंकटभठ मान्यता पावती । महाभाष्याचार्य म्हणोनी ॥ २४ ॥

तदनंतरी उडिपीस जाती । श्रीकृष्ण दर्शन तेथे घेती ।
कुंभकोणी पुनःश्च येती । मध्वाचार्य तत्व प्रसारार्थ ॥ २५ ॥

स्वामींचे साहित्य अपार । त्यांनी केला धर्म प्रसार ।
भारतवर्षी त्यांचा संचार । अव्यहात झालासे ॥ २६ ॥

चंद्रिका प्रकाश तत्व मंजिरी । गिता निवृत्ती गीतार्थ मंजिरी ।
तैसीच रामकृष्ण चरित्र मंजिरी । साहित्ये निर्मीले असे ॥ २७ ॥

अणुभाष्य टिका ईशावास्य निवृत्ती। भावदीपीका अथर्व निवृत्ती।
भावसंग्रह त्रिवेदी विवृत्ती। भट्टसंग्रह मिमांसा ॥ २८ ॥

मंत्रार्थ दशप्रकरण टिप्पणी। भेदबोधीनी वादावली टिप्पणी।
पुरूषसुक्त तर्ककांड टिपणी। प्रातः संकल्प तैसाची ॥ २९ ॥

अथर्णी सुक्त व्याख्यान। हिरण्य गर्भसुक्त व्याख्यान।
दशोपनिषद खंडार्थ महान। स्वामिनी लिहीला असे ॥ ३० ॥

स्वामी असती गुरु श्रेष्ठ। स्वामी असती संत श्रेष्ठ।
अभिषेक तीर्थसागराहुनि श्रेष्ठ। माझे स्वामी राघवेंद्र ॥ ३१ ॥

कपट वृत्तींचा नाश करिती। सुविचारांचे पोषण करिती।
मंदबुद्धी हरण करिती। मतीमंद लोकांची ॥ ३२ ॥

महिलांचे वंध्यत्व नष्ट करितो। पुत्रप्राप्ती करून देती।
अंधजना दृष्टी देती। गुरु श्रेष्ठ स्वामी माझे ॥ ३३ ॥

दुष्टांचे निर्दालन करिती । सुष्टांचे रक्षण करिती ।
दु खीतांचे दुःख हरिती । माझे स्वामी राघवेंद्र ॥ ३४ ॥

स्वामीजी देती मोक्ष प्राप्ती । रोगपिडीतांना रोग मुक्ती ।
भक्तांना भाग्य प्राप्ती । देती स्वामी राघवेंद्र ॥ ३५ ॥

राघवेंद्र स्वामी पुत्रसौख्य देती । संसार सागर तरविती ।
भक्त चिंता दूर करिती । चिंतामणी राघवेंद्र ॥ ३६ ॥

वक्तृत्व शक्ती मुक्यां देती । अल्पायुषि दीर्घायुषी होती ।
भक्तांकरवी सत्कृत्य करविती । धन्य धन्य राघवेंद्र ॥ ३७ ॥

जयजयाजी राघवेंद्रा । घालवा आमुची अज्ञाननिद्रा ।
दूर करा अहंता छिद्रा । दया करा महाराजा ॥ ३८ ॥

ऐसी प्रार्थना स्वामींना । जे जे करिती त्या भक्तांना ।
राघवेंद्र स्वामी हात देतांना । अनेकांनी अनुभविले ॥ ३९ ॥

विष्णु सर्वोत्तम तत्व सांगण्या । धर्म प्रसारार्थ तीर्थ यात्रा करण्या ।
दुःखीतांना सहाय्य करण्या । निघती राघवेंद्रतीर्थ हो ॥ ४० ॥

प्रथम येती शंखपुरी । तदनंतरी रामेश्वरी ।
मथुरा क्षेत्र नंतरी । राघवेंद्रतीर्थ पोचती ॥ ४१ ॥

तेथून येती नामगिरी क्षेत्री । श्रीरंग आणि वेल्लूर क्षेत्री ।
सुब्रह्मण्य ब्रह्मपूरक्षेत्री । येती स्वामी धर्मप्रसारार्थ ॥ ४२ ॥

कोल्हापुरी लक्ष्मी दर्शन । पंढरपुरी पांडुरंग ध्यान ।
रायचूरमार्गे व्यंकट दर्शन । कुंभकोणी पोचती ॥ ४३ ॥

मंत्रालयाची मंत्रालयांबिका । असे कुलदेवता भाविका ।
स्वामींनीं तिचे दर्शन घेता । वृन्दावनस्थ होणे कथियेले ॥ ४४ ॥

श्रावण वद्य प्रथम दिनी । शके पंधराशे त्रॅणणव शालीवाहनी ।
योगिंद्र तीर्थांना राघवेंद्रानी । मठाधिकार स्वयें दिले ॥ ४५ ॥

राम पुजा करिती भक्ती भावें । भक्तां तीर्थ दिलें वात्सल्य भावे ।
हितोपदेश प्रेम भावें । सर्व लोकांलागीं ॥ ४६ ॥

संकटी हाक मारावी । प्रेमभावे दुःखें सांगावीं ।
त्याच क्षणी दुःख मुक्ती व्हावी । याचा प्रत्यय देईन ॥ ४७ ॥

तत्क्षणीं मी पावेन । तुम्हां मार्गदर्शन करेन
शब्दी उणेपणा नाणेन । श्रद्धेने नामस्मरण करा ॥ ४८ ॥

स्वामीजी भक्तांवचन देती । तदनंतरी वृन्दावनी प्रवेश करिती ।
कुर्मासन ते घालिती । चित्मुद्रा धारण करोनि ॥ ४९ ॥

अलोट गर्दी दर्शनासाठीं । भाविक जमती भेटीसाठी ।
साश्रुनयनांनी लाविती दृष्टी । एक टक स्वामीकडे ॥ ५० ॥

शकें पंधराशें त्रेणणव मासी । श्रावण वद्य द्वितीयेसी ।
स्वामी करिती प्रवेशासी । वृन्दावना माजी ॥ ५१ ॥

अगाध असे राघवेंद्र लीला । मोक्षदाता महामुनी भेटला ।
कर्नाटक आंध्र प्रदेशाला । ऐका लीला आतां त्या ॥ ५२ ॥

उत्तर कर्नाटकीं गदगला । देसाई पुत्र जीवंत केला ।
सौवनुर नबाब पुत्राला । नवजन्म दिला स्वामींनी ॥ ५३ ॥

अनाथ व्यंकण्णा दिवाण झाले । अनेक जीवांचे भले झाले ।
कित्येकजण संकट मुक्त झाले । स्वामींचे भले स्मरण करितां ॥ ५४ ॥

वृन्दावनीं ते समाधिस्त झाले । वृन्दावन स्थळ जागृत राहिले ।
सगुणरूपें दर्शन दिधले । मनरो जिल्हाधिकाऱ्यासी ॥ ५५ ॥

इसवीसन अठरासें माझारी । मनरो होते बल्हारी जिल्हाधिकारी ।
मंत्रालया इनामें मिळाल्याने सारी । निरर्थक अेवणावळी होताती ॥ ५६ ॥

मनरोला वाटे खर्च वाह्यात । विचार केला गांव करावा जप्त ।
त्या हेतुने दर्शन घेतां तेथ । आकाशवाणी होत असे ॥ ५७ ॥

'जप्त न करी हा गांव'। वृन्दावनी उभे स्वामीराव।
राघवेंद्र बोलती सहेद। दर्शन देती मनरोला ॥ ५८ ॥

इतर भक्ते जें न देखिलें। तें मनरोला दर्शन झाले।
भक्तीभावे तयें नमस्कारिलें। इनाम गांव कायम राही ॥ ५९ ॥

स्तोत्र वाचकां माझी प्राथना। चलाचला मंत्रालयी दर्शना।
जीवन तुमचें पावन होण्या। विनवितसे सद्गुरू प्रभु ॥ ६० ॥

कळकळांची ही विनंती। जे राघवेंद्रा आठवती।
प्रतिदिनी स्तोत्र वाचती। मुक्त होती सर्व दुःखांतुनि ॥ ६१ ॥

हें सांगणें अंतरीचे। हे बोलणें प्रचितीचें।
कर्म योगा न सोडायाचें। साह्य करिती राघवेंद्र ॥ ६२ ॥

व्यसन मुक्त असावें। समाज कल्याणा धावून जावें।
अंतःकरण प्रेमयुक्त व्हावे। सद्गुरू प्रभु सांगतसे ॥ ६३ ॥

श्री राघवेंद्र सहाय्य करिती । संकटी हाक मारावी त्यांप्रती ।
आणि घ्यावी प्रचिती । क्षणार्धांत ॥ ६४ ॥

हें एकाध्यायी चरितामृत । तिथी द्वादशी कार्तिकांत ।
सिद्ध योगीं सिद्ध होत । शके अेकोणीसशें नवांतरी ॥ ६५ ॥

इति श्री रामप्रेरणया आजगांवकर इत्युपनामक सद्गुरू प्रभु विरचित।
श्री राघवेंद्र स्वामी चरितामृत स्तोत्र संपूर्णम ॥

—×०×—

# समर्पण !

श्री राघवेंद्रस्वामींचे परम भक्त

**कै. बापूसाहेब कोंडकर** ( बी. जे. कोंडकर )

मध्यवर्ति सरकारचे सेवानिवृत्त अधिकारी,

यांच्या स्मृतिप्रित्यर्थ—

भक्तजनांच्या नित्यउपयोगासाठीं प्रसिद्ध केले आहे.

# उपयुक्त ग्रंथ

(१) आनंदनाथ महाराज कृत—

**स्वामी समर्थ स्तवनगाथा** पृष्ठसंख्या ७००

अनेक दुर्मिळ छायाचित्रें किंमत २१० रु.

दत्तसंप्रदायाची स्तोत्रें, भजनें, सांप्रदायिक व्यक्तिचित्रें

दत्तभक्तांना व स्वामी समर्थ भक्तांना उपयुक्त ग्रंथ

(२) **डॉ पंढरीनाथ प्रभू** किंमत ३० रु. चरित्र ग्रंथ

(३) **प्राचीन मराठी संतकवि** खंड २ रा व ३ रा

पृष्ठ संख्या १०००, किं. १०० रु.

(४) **भारतांतील शास्त्रांचा उद्‌गम व विकास**

ले. डॉ. पंढरीनाथ प्रभू : पृष्ठ संख्या ३२०

(५) **तबलापटु जी. एल. सामंत** किंमत ५५ रु.

(६) **नटवर्य परशुराम सामंत** किंमत ३० रु.

**पत्ता : गुं. फ. आजगांकर** १७ के. जी. बी. निवास

गिरगांव मॅजेस्टिकसमोर, मुंबई ४.